महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २८८ वा | दिनांक : १६/०९/२०२५ | वार : मंगळवार

## मराठी माणसाने फक्त सतरंज्या उचलायच्या का ? : सुषमा अंधारे



**मुंबई :** हुकूमशाहीने भरलेल्या भाजपने विरोधकांसह स्वपक्षातील लोकांनाही लाथाडल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली आहे. केशव व माधव (केशव उपाध्ये व माधव भंडारी) हे मराठी आहेत. पण मराठी माणसाने फक्त सतरंज्या उचलायच्या आणि मलिदा मात्र उपऱ्या मोहित कंबोजला मिळणार, असे त्यांनी या दोन्ही नेत्यांचा चिमटा काढत म्हटले आहे. दरम्यान, काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी भाजपतून व्हीआरएस घेतलेल्या एका नेता - कम - बिल्डरला लागोपाठ एसआरए प्रकल्प कसे मिळतात? असा सवाल उपस्थित करत मोहित कंबोज यांच्यावर निशाणा साधला आहे.

भाजप नेते मोहित कंबोज यांनी नुकतीच सक्रीय राजकारणाला सोडचिठ्ठी दिली आहे. सध्या त्यांनी आपल्या उद्योग व्यवसायावर लक्ष केंद्रीत केले आहे. पण आता त्यांना सरकारच्या मर्जीने मुंबईतील काही महत्त्वाचे एसआरए प्रोजेक्ट दिले जात असल्याचा आरोप केला जात आहे. यासंबंधीची खमंग चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. या पार्श्वभूमीवर सुषमा अंधारे यांनी त्यांच्यासह भाजपच्या एकूण संस्कृतीवरच निशाणा साधला आहे. त्या सोमवारी आपल्या एका ट्विटमध्ये म्हणाल्या, केशव - माधव मराठी आहेत. तेव्हा मराठी माणसाने फक्त सतरंज्या उचलायच्या आणि मलिदा मात्र उपऱ्या कंबोजला मिळणार. उचला अजून फडणवीसांची तळी. वाजवा त्यांची टाळी. पण फक्त, परप्रांतीय कंबोजलाच मिळणार पोळी.

काय केशवराव, माधवराव पटतंय ना? ही भाजपा अडवाणी वाजपेयी ची भाजपा नाही. ही भाजपा मोदी फडणवीस यांनी उध्वस्त केलेली भाजपा आहे. ही भाजपा हुकूमशाहीने भरलेली आहे. विरोधकांचे सह अस्तित्व नाकारतेच पण सोबतच सत्ताधारी स्वपक्षातल्या लोकांना सुद्धा लाथाडते. सत्तेला वाटा असो कंत्राट असो की निधी असो केशवराव तुमच्या तोंडाला पानेच पुसली जाणार, असे अंधारे यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे, काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनीही सर्व एसआरए प्रोजेक्ट मोहित कंबोजला मिळण्यावर संशय व्यक्त केला आहे. त्या आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या, भाजपातून 'व्हीआरएस' घेतलेल्या एक नेता-कम-बिल्डरला एकापाठोपाठ एक SRA प्रोजेक्ट कसे मिळतात? जुहू येथे मुंबई महापालिकेच्या सफाई कामगार कॉलनीची जमीनही त्याच्याशी संलग्न कंपनीला कशी दिली?

जनतेचे हे प्रश्न आम्ही विचारताच, या महाशयांना आणि भाजपच्या आयटी सेलला इतकी मिरची लागली की, त्यांनी लगेच त्यांनी फेक नरेटीव्ह फॅक्टरी पूर्ण वेगाने सुरू केली. माझ्या आणि माझ्या पतीबद्दल खोट्या गोष्टी पसरवून अपप्रचार करायला लागले. यावरून एक गोष्ट सिद्ध होते की आमचा बाण थेट निशाण्यावर लागला आहे. यांच्या बोगस आयटी सेलने असा खोटा प्रचार केला की, माझ्या पतीचे Patra Chawl प्रकल्पात अनेक फ्लॅट आहेत. मी त्यांना आव्हान देते की, असा एकतरी फ्लॅट दाखवून द्या. ते दाखवू शकणार नाहीत, कारण हे धादांत खोट आहे. हा यांचा नेहमीच अजेंडा आहे— खोटे आरोप करा, विरोधकांना धमकावा.

पण जर कोणाला वाटत असेल की, त्यांच्या धमक्यांमुळे आम्ही सत्याची लढाई सोडून देऊ, तर त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी... मी काँग्रेसची शिपाई आहे आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अनुयायी आहे, मी घाबरणार नाही,सत्यासाठी लढत राहणार. माझी मुख्यमंत्र्यांकडे पुन्हा एकदा मागणी आहे की या नेत्याच्या कंपनीला अचानक इतके प्रकल्प कसे मिळाले, याची निष्पक्ष चौकशी करा, असे वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे.

## आचार्य देवव्रत यांनी घेतली महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ



**मुंबई :**महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून आचार्य देवव्रत यांनी आज पदाची शपथ घेतली. राजभवनात पार पडलेल्या या शपथविधी सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्रीमंडळातील काही मान्यवर तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांनी आचार्य देवव्रत यांना पदाची शपथ दिली.

आचार्य देवव्रत यांचा प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील दीर्घ अनुभव लक्षात घेता त्यांच्याकडून राज्यपालपदाची जबाबदारी समर्थपणे पार पडेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. शपथविधीनंतर देवव्रत यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करण्याचे म्हटले आहे. यानंतर राज्यपाल भवनात अधिकृत सत्काराचा कार्यक्रमही पार पडला.

महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारण्यासाठी गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे रविवारीच मुंबई येथे सपत्नीक आगमन झाले. अहमदाबाद येथून तेजस एक्स्प्रेसने आलेल्या राज्यपालांचे तसेच त्यांच्या पत्नी दर्शना देवी यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल स्थानकावर पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी राज्यपालांना मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकावर रेल्वे पोलिसांतर्फे मानवंदना देण्यात आली तर राजभवन येथे पोहोचल्यावर मुंबई पोलिसांतर्फे मानवंदना देण्यात आली.

उपराष्ट्रपती म्हणून निवड झाल्यानंतर सीपी राधाकृष्णन यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला. आयएएनएसच्या वृत्तानुसार, राष्ट्रपतींचे प्रेस सचिव अजय कुमार सिंह यांनी ११ सप्टेंबर रोजी एक अधिकृत आदेश जारी केला. यात म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या सध्याच्या कर्तव्यांव्यतिरिक्त त्यांची कामे पार पाडण्यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे.

आचार्य देवव्रत जुलै २०१९ पासून गुजरातच्या राज्यपालपदाचा कार्यभार सांभाळत आहेत. यापूर्वी त्यांनी ऑगस्ट २०१५ ते जुलै २०१९ पर्यंत हिमाचल प्रदेशचे राज्यपाल म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या अनुभवामुळे आणि प्रशासकीय कौशल्यामुळे त्यांना महाराष्ट्राची जबाबदारीही सोपवण्यात आली आहे. आता ते दोन्ही राज्यांच्या कारभारावर लक्ष केंद्रित करतील आणि राज्यपाल म्हणून त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडतील.

## विश्वास पाटलांच्या मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष निवडीला वंचित बहुजन आघाडीचा विरोध

**सातारा :** सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची निवड झाल्याबद्दल वंचित बहुजन आघाडी, सातारा जिल्ह्याच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राज्यातील वातावरण तापलेले असताना, पाटील यांनी केलेल्या काही विधानांमुळे समाजात जातीय तेढ निर्माण होत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे सातारा जिल्हा महासचिव गणेश भिसे यांनी प्रसिद्धिपत्रक काढून आपली भूमिका मांडली आहे.सध्या मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण यावरून वातावरण तापले असताना, विचारवंत म्हणून समाजामध्ये सामंजस्याची भूमिका घेत समाज एकसंध कसा राहील अशा पद्धतीची भूमिका घेणे गरजेचे होते. याउलट विश्वास पाटील यांनी मला जातीचा दाखला मिळाला नाही, म्हणून मला खालच्या जातीच्या हाताखाली काम करावे लागले, अशी भावना समाजमाध्यमांच्या मध्ये बोलून दाखवली. यातून त्यांची जातीय मानसिकता दर्शवत आहे, असे भिसे यांचे म्हणणे आहे.

आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांनी आरक्षण देत असताना समाजाला जे दुबळा घोडा आणि सशक्त घोडा यांच्यामधील स्पर्धेचे उदाहरण दिले, हे सोयीस्करपणे पानिपतकार विसरले असे दिसत आहे. हजारो वर्ष जातीच्या नावाने येथील मूळच्या अस्पृश्य तसेच अलुतेदार बलुतेदार, कुणबी बांधवांचे शोषण झाले हा इतिहास आहे. याच बांधवांना समान संधी मिळावी यासाठी प्रतिनिधित्वाची संधी म्हणजे आरक्षण, याची पुरेपूर जाणीव असून सुद्धा जाणीवपूर्वक जातीय तणाव निर्माण करण्याचे काम विश्वास पाटील यांनी केले आहे. परंतु हा महाराष्ट्र छत्रपती शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, माता जिजाऊ, माता अहिल्या, माता भिमाई, माता रमाई यांचा महाराष्ट्र आहे. यामध्ये कोणी कितीही भेदाभेद करण्याचा प्रयत्न केला तरी तो यशस्वी होणार नाही, असे भिसे यांनी म्हटले आहे.

आम्ही वंचित बहुजन आघाडी सातारा जिल्ह्याच्या वतीने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजकांना आवाहन करतो की, साहित्य संमेलनाचा अध्यक्ष हा समस्त मानव जातीच्या कल्याणाचा विचार करणारा आणि आपल्या साहित्यातून कृतीत उतरवनारा असावा. जाती जातीमध्ये भेद निर्माण करणारा नसावा याचा विचार करावा. पानिपतकर विश्वास पाटील यांनी आपली जात सोडून इतर जातीविषयी भूमिका काय हे स्पष्ट करावी, तसेच समस्त बहुजन समाजाची माफी मागावी, अन्यथा आम्ही वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विश्वास पाटील यांना साताऱ्यात विरोध करणार, असा इशाराही वंचित बहुजन आघाडीचे सातारा जिल्हा महासचिव गणेश भिसे यांनी दिला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ सप्टेंबर २०२५


## डॉ. रामलिंग पुराणे पुन्हा बसले खड्ड्यात, राष्ट्रीय महामार्गाची दयनीय अवस्था...

### बसव प्रतिष्ठानचा आंदोलनाचा इशारा..





**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरूम ते अक्कलकोट जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ब ची दयनीय अवस्था झाली आहे, २०२३ मध्ये या रस्त्याचे काम एका बड्या गुत्तेदारानी केले होते.

आज रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत, या मार्गावरील आलूर ते बोळेगाव या रस्त्यावरील १ किलो मिटर रस्ता काम शेतकऱ्यांनी मावेजा साठी अडवला होता, मात्र त्यासंदर्भात निकाल लागून ६ महिने झाले अद्याप रस्ता काम झाला नाही.

दि. १५ वार सोमवार रोजी बसव प्रतिष्ठान अध्यक्ष तथा समाजसेवक डॉ. रामलिंग पुराणे यांनी रस्त्यावर पाणी साचलेल्या खड्ड्यात बसून लाक्षणिक आंदोलन करून संबंधित गुत्तेदार व प्रशासनाला एक महिन्यात रस्त्या बाबतच्या समस्या सोडवावे अन्यथा बसव प्रतिष्ठान च्या माध्यमातून आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा त्यांनी यावेळी दिला.मुरूम ते अक्कलकोट रस्त्यावर खड्डे व पाणी साचल्याने रहदारीस अडथळा.

आलूर ते बोळेगाव रस्ता २०२३ मध्ये शेतकऱ्यांनी मावेजा न मिळाल्याने आडवल्यामुळे अर्धवट सोडण्यात आले होते. दोन वर्षांपासून या रस्त्याची दुरावस्था झाली असून या रस्त्यावरुन प्रवास करणे जिकीरीचे झाले आहे.उमरगा अक्कलकोट रस्ता भाविक व प्रवाशांना सोयीचा होता पण शेतकऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे परिसरातील नागरिकांनी याचा प्रचंड त्रास सोसावा लागत आहे.प्रशासनाकडे वारंवार ग्रामपंचायत व बोळेगाव येथिल नागरीकांनी पाठपुरावा करून देखील याची दखल घेतली नाही.

कोर्टातसुद्धा याचा निकाल लागला असुन अजुनपर्यंत याकडे दुर्लक्ष केले जात आहे. यावर्षी आलुर येथे ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने या रस्त्याची पार वाट लागली आहे,या रस्त्यावरील पुल फुटुन गेल्यामुळे रस्त्यावरुन पाणी वहात आहे,रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून गाड्यांचे अपघात होत आहेत,तरीसुद्धा प्रशासनाचे याकडे लक्ष नसल्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास भोगावा लागत आहे.

लवकरात लवकर या रस्त्याची शासनदरबारी दखल घेऊन प्रवाशांची गैरसोय दुर करावी अशी मागणी नागरिकांतूनही होत आहे.

> गुत्तेदार आणि प्रशासनानी जनाची नाहीतर नाही मनाची तरी लाज बाळगून रकडलेला रस्ता काम व ठीक ठिकाणी रस्त्यावर पडलेले खड्डे तात्काळ दुरुस्त करावे अन्यथा त्याच ठिकाणी शड्डू ठोकून आंदोलने छेडण्यात येईल...
>
> **डॉ. रामलिंग पुराणे,**
> अध्यक्ष, बसव प्रतिष्ठान

## व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेस १६ लाख ९४ हजार रुपयांचा निव्वळ नफा



**मुरूम, ता. उमरगा येथील व्यापारी नागरी पतसंस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या उद्घाटन प्रसंगी उमेश कारभारी, श्रीकांत मिणीयार, अशोक चव्हाण, अंबाजी बिराजदार, रवींद्र ख्याडे, शशिकांत बाबशेट्टी व अन्य.**

**मुरूम, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (ता.१४) रोजी उत्सवाच्या वातावरणात पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी पंडित चिलोबा होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते लक्ष्मीच्या प्रतिमेचे पूजन करून दीप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष उमेश कारभारी, सचिव श्रीकांत मिणीयार, उपाध्यक्ष अशोक चव्हाण, संचालक अंबाजी बिराजदार, रवींद्र ख्याडे, शशिकांत बाबशेट्टी, दत्तात्रय गिरिबा, सुरेश रणसुरे, प्रवीण सोलापुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी श्रीकांत मिणीयार म्हणाले की, यंदाच्या आर्थिक वर्षात पतसंस्थेस १६ लाख ९४ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाल्याचे सांगून या पतसंस्थेकडे यंदा ३७ लाख ४० हजार ६२५ रुपयाचे भाग भांडवल, ८ कोटी ३१ लाख ४९ हजार ३८५ रुपयाच्या ठेवी, संस्थेने ६ कोटी ५० लाख ४७ हजार ७८५ रुपयाचे कर्ज वाटप केले.

गुंतवणूक ४ कोटी ४२ लाख ५५ हजार ८८८ रुपये असून या संस्थेचे एकूण ५६१ सभासद आहेत. प्रास्ताविका व अहवाल वाचन व्यवस्थापक एस. सी. तुगावे यांनी केले. सूत्रसंचालन बाळासाहेब गिरीबा तर आभार सहव्यवस्थापक सिद्धरामेश्वर स्वामी यांनी मानले.






## इकरा पब्लिक शाळेत हिंदी दिवस उत्साहात साजरा



**जळगाव :** यावेळी हिंदी नाटिका सादर करण्यात आली. संवादाचे माध्यम, भावनांचे सार, हिंदीतून व्यक्त होतो भारत असे प्रतिपादन डॉ.अ. करीम सालार यांनी केले.

तसेच हिंदी भाषा शिक्षक शफीक अन्सारी यांनी काव्य वाचन केले.तर शिक्षीका जिया उननिसा यांनी उत्तम माहिती सादर केले.

आरीफ खान यांनी हिंदी भाषेला देण्यात आलेल्या राष्ट्रभाषेच्या दर्जा विषयी माहिती दिली. हिंदी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्याचे आवाहन यावेळी साजीद खान व मोहसिन खान यांनी केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी हिंदी कविता सादर केल्या.पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घोषवाक्य लेखन, निबंध लेखन, कविता सादरीकरण हे कार्यक्रम संपन्न झाले.शाळेचे प्राचार्य शेख शकील यावेळी उपस्थित होते.

सूत्रसंचालन आणि आभार आरीफ खान यांनी केले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ सप्टेंबर २०२५

# वर्दीतील 'राजा माणूस' काळाच्या पडद्याआड



**खुलताबाद (प्रा. योगेश रावते) :** खुलताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक श्री. अंबादास मोरे ( वय ५६ रा. देवगिरी व्हॅली मिटमिटा छ. संभाजीनगर ) यांचे दिनांक १४ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून,जावई,नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषद प्रा. शा. खुलताबाद येथील शिक्षिका सुनीता मोरे यांचे ते पती होत.

श्री अंबादास मोरे यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत आपल्या मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर पोलीस खात्यात उपनिरीक्षक पदापर्यंत भरारी घेतली होती. ते मूळचे खुलताबाद तालुक्यातील खिर्डी या गावचे रहिवासी होते.

अतिशय मनमिळावू,प्रेमळ स्वभावामुळे सामान्य जनतेत व मित्र परिवारात एक 'राजा माणूस' म्हणून नावलौकिक होता.जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेर विविध ठिकाणी उल्लेखनीय सेवा करत त्यांनी नावलौकिक मिळविला होते.

त्यांच्या अचानक जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. खुलताबाद तालुक्याने एक भूमिपुत्र गमावल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त सामूहिक महाराष्ट्र गीत व देशभक्तीपर कवायत कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या औचित्याने 17 सप्टेंबर 2025 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे 75 हजार विद्यार्थ्यांचा सामूहिक महाराष्ट्र राज्य गीत गायन व देशभक्तीपर कवायत कार्यक्रम भव्यदिव्य पद्धतीने होणार आहे.

या कार्यक्रमाला राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री तसेच शालेय शिक्षणमंत्री , जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार महोदय, सर्व आमदार महोदय, विभागीय आयुक्त , मनपा आयुक्त , जिल्हाधिकारी महोदय, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे सह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांनी सांगितले.

यापैकी 30 हजार विद्यार्थी गोकुळ स्टेडियम, ग्रामीण पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष सहभागी होतील, तर उर्वरित 45 हजार विद्यार्थी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतून आभासी प्रणालीद्वारे सहभागी होणार आहेत. या ऐतिहासिक उपक्रमासाठी जिल्हाभरातील शाळांची नोंदणी पूर्ण झाली असून विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे.

या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा नियोजन समितीने घेतला असून वाहतूक व्यवस्था, बस पार्किंग, विद्यार्थ्यांचा पोशाख, मैदानातील उभे राहण्याच्या जागा, तसेच कार्यक्रमानंतरचा कचरा व्यवस्थापन या सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली आहे.शहरातील व जिल्ह्यातील अनेक शाळा, सेवाभावी संस्था आणि शैक्षणिक संघटनांनी विद्यार्थ्यांसाठी पाणी बॉटल, बिस्किटे, पौष्टिक आहार यांसारखी मदत केली आहे.

अजूनही मदतीचा ओघ सुरूच आहे.---सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रेलचेलमुख्य कार्यक्रमासोबत विविध शाळांनी सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला आहे. विद्यार्थ्यांना सोयीसाठी अनेक शाळांनी बससेवाही उपलब्ध करून दिली आहे. विविध स्तरावरून या कार्यक्रमाची माहिती दिली जात आहे. त्यामुळे जनमानसात देशभक्तीची भावना आणि राज्यगीताबद्दल अभिमानाची जाणीव निर्माण होत आहे.

शालेय शिक्षणमंत्र्यांची विशेष दखल राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी या उपक्रमाची विशेष दखल घेतली असून, हा कार्यक्रम आगामी काळात राज्यभर होणाऱ्या देशभक्तीपर गीतांच्या सामूहिक कवायतींसाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी या उपक्रमाला 'दशसूत्री उपक्रमा अंतर्गत संस्कारातून देशभक्तीचे मूल्य रुजवली जाईल असे संबोधले असून, जिल्ह्यातील विविध विभागांनी अमूल्य सहकार्य दिले आहे.

देशभक्तीची भावना जागृत करणारा उपक्रममराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त जिल्हा पातळीवर भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. कार्यक्रमामध्ये सामूहिक महाराष्ट्र राज्यगीत गायन तसेच देशभक्तिपर कवायत घेण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी शहरातील शाळांनी वाहतूक सुविधा उपलब्ध करून दिली असून, विविध सेवाभावी संस्था व शिक्षक संघटनांनी पाणी, बिस्किटे आणि पौष्टिक आहाराची व्यवस्था केली आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करणारा ठरेल.

राज्याचे शालेय शिक्षण मंत्री स्वतः या आयोजनाची दखल घेऊन कौतुक नोंदवले आहे. त्यामुळे हा कार्यक्रम राज्यभरासाठी एक आदर्श ठरेल अशी अपेक्षा आहे.

**अश्विनी लाठकर**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

# ज्योतीताई निकम-जाधव आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित



**शिऊर (प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद शिक्षण विभाग आयोजित श्री संत एकनाथ रंगमंदिर येथे हा भव्य दिव्य सोहळा आयोजित करण्यात आला होता. पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास विकासमंत्री अतुल सावे, आमदार विक्रम काळे, आमदार प्रशांत बंब, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित सर, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, अश्विनी लाठकर, अरुण शिंदे यांच्यासह सर्व उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक आणि शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. वर्ष 2025 च्या प्राथमिक विभागातून कार्यरत १२ हजार शिक्षकांमधून ही निवड झाली.

शिऊर येथील सौ ज्योतीताई विठ्ठलराव निकम -जाधव या जि. प. आदर्श शाळा सुदामवाडी येथे कार्यरत आहे. शाळा हे ज्ञान, संस्कार आणि प्रगतीचे केंद्र बनले आहे.या छोट्याशा शाळेने मोठे यश प्राप्त केले आहे. 2018-19 मध्ये, पाणी फाउंडेशन अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार मिळवला. हा सन्मान सामूहिक प्रयत्नांची सुरुवात होती. 2021 मध्ये शाळा 'आदर्श शाळा' झाली आणि आज त्याच फलितामुळे दीड कोटींच्या भव्य इमारतीचे बांधकाम चालू आहे.शिक्षणाबरोबरच पर्यावरणाबद्दलची जबाबदारी विसरलेले नाही. 2021 मध्ये सुरू केलेला 'घनवन प्रकल्प' आज घनदाट वनात रूपांतरित झाला आहे. शाळेत 400 पेक्षा जास्त झाडे लावलेली आहेत, ज्यामुळे एकेकाळचा उजाड डोंगर आज हिरव्यागार डोंगरात बदलला आहे.

शैक्षणिक कामगिरीचं दुसरं एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे स्पर्धा परीक्षांमध्ये मिळवलेले यश. एनएमएमएस, नवोदय, मंथन, एमटीएस सारख्या कठीण स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थी दरवर्षी उत्तम यश मिळवतात. 'मी ज्ञानी होणार' या राज्यस्तरीय परीक्षेत यावर्षी 11 विद्यार्थ्यांनी राज्यात प्रथम क्रमांक मिळवून शाळेचा गौरव वाढवला आहे.खेळांमध्ये देखील मागे नाही.

जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी अनेक वेळा यश मिळवले आहे. 'संगीतमय परिपाठ', 'चला इंग्रजी बोलूया' सारखे उपक्रम शैक्षणिक दिनचर्येचा एक महत्त्वाचा भाग आहेत. या लहान पण मोठ्या प्रयत्नांना मोठ्या मान्यताही मिळाल्या आहेत. 2024 मध्ये, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा प्रकल्पाच्या टप्पा क्र. 1 अंतर्गत वैजापूर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे शाळेची पटसंख्या 156 वरून 240 पर्यंत पोहोचली आहे. शंभराहून अधिक विद्यार्थी आज बाहेरच्या गावांहून शिकायला येतात.

त्यांच्यासाठी गावकऱ्यांनी स्वतः एक बस सुरू करून अल्प दरात विद्यार्थ्यांना ये-जा करण्याची सोय पुरवते.

या प्रयत्नांना अनेक महान व्यक्तींचे मार्गदर्शन लाभले आहे. गेल्या दोन वर्षात आदरणीय जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, कुलगुरू प्रमोदजी, शिक्षणाधिकारी जयश्रीताई चव्हाण, पद्मश्री किरण शेठ, पद्मश्री रोनू मुजुमदार, उद्योजिका बोल्सम खोचे आणि अभिनेत्री राजश्री देशपांडे यांसारख्या थोर व्यक्तींनी आमच्या शाळेला भेट देऊन आमचा उत्साह वाढवला आहे.विद्यार्थ्यांचा उमलते भावविश्व हा स्वलिखित काव्यसंग्रह शाळेने प्रकाशित केला आहे. तालुका आणि जिल्हा स्तरावर निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांमध्ये त्यांनी उत्तम यश मिळवले आहे. विद्यार्थी आणि गावकऱ्यांनी मिळून एक छोटीशी सुंदर परसबाग तयार केली आहे, जिथून मिळालेल्या भाज्या शाळेतील 'खिचडीत 'वापरतात.

### सौ ज्योतीताई विठ्ठलराव निकम यांची विनम्र प्रतिक्रिया

शाळा ही केवळ एक इमारत नसून, एक कुटुंब, एक चळवळ आणि एक स्वप्न आहे. शैक्षणिक उज्वल स्वप्नपूर्तीसाठी आमचे शिक्षक, गावकरी आणि विद्यार्थी सर्वजण एकत्रितपणे काम करत आहोत. आमच्या या सामूहिक प्रयत्नांमुळेच आज आमची शाळा खरंच एक 'आदर्श शाळा' बनली आहे.मी फक्त प्रतिनिधिक स्वरूपात शाळेच्या व गावच्या वतीने हा जिल्हा आदर्श शिक्षिका सन्मान स्वीकारला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ सप्टेंबर २०२५

## जीवन चव्हाण यांचा 'आयकॉन्स ऑफ मराठवाडा' पुरस्काराने सन्मान




**गुंजोटी, (प्रा. नागसेन कांबळे):** येथील श्रीकृष्ण विद्यालयातील कलाशिक्षक जीवन चव्हाण यांचा नवभारत-नवराष्ट्र समूहाच्या वतीने 'आयकॉन्स ऑफ मराठवाडा' पुरस्कार राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते रविवारी (ता.14) प्रदान करण्यात आला.

लातूर येथे आयोजित कार्यक्रमात औशाचे आमदार अभिमन्यू पवार, नवभारतचे ग्रुप प्रेसिडेंट ए. श्रीनिवास, संजय मलमे, मराठवाड्याचे सरव्यवस्थापक कल्याण पांडे, जयप्रकाश दगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जीवन चव्हाण यांना सन्मानित करण्यात आले.

चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी चित्रकला क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे तसेच विद्यार्थ्यांमध्ये कला विषयाबद्दल अभिरुची निर्माण करण्यासाठी कलेतील प्राविण्य, अध्यापनातील कौशल्य आणि विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता जागृत करण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्न करत तेहतीस वर्षात अनेक विद्यार्थी घडविले आहेत, याची दखल नवभारतने घेत त्यांचा सन्मान करण्यात आला.

या पुरस्काराबद्दल श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव दामोदर पतंगे, अध्यक्ष विभावरी शाईवाले, उपाध्यक्ष प्रभाकर हिरवे, सहसचिव मंदाकिनी पाटील, संचालक डॉ. सागर पतंगे, डॉ. श्याम इबत्ते, श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड, श्रीकृष्ण कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य कल्लय्या स्वामी, प्रशालेचे मुख्याध्यापक रविराज पाटील, उपमुख्याध्यापक सत्यवान भालेराव, पर्यवेक्षक अविनाश पाटील, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक दत्तात्रय गायकवाड आदींनी अभिनंदन केले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## खड्डे वाचवताना दोन ट्रकचा अपघात झाला



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : रात्री साडे अकरा च्या सुमारास धुळे सोलापूर महामार्गावरील माळीवाडा जवळ समृद्धी महामार्गावरील पुलाच्या खाली असलेल्या महामार्गावर मुंबई येथून ट्रक क्र MH ४६ BM ४०७३ हा चालक सुधाकर उपाध्याय वय ५७ वर्ष हा छत्रपती संभाजी नगर कडे जात असताना रस्त्यावर पुढे जाणाऱ्या ट्रक क्र MH२० GC ४१७६ लापाठीमागून धडक मारली व नंतर चालकाने सावधगिरी बाळगत ट्रक दुभाजक वर चढवून दिली.

यात ट्रक समोरून चक्काचूर होऊन ट्रक चे मोठे नुकसान झाले आहेसुदैवाने जीवित हानी झाली नाही करोडी टोल नाक्यापासून ते कन्नड रोडवर रस्त्यावर जागोजागी खड्डेच खड्डे पडले आहेत या खड्डे चुकवताना रस्त्यावर छोटे मोठे अपघाताचे प्रमाण खूप वाढले आहेदि १४ रविवार दुपारी कन्नड येथील सचिन कचरू जाधव आपल्या दुचाकी क्र MH२७ CG ९३८३ वरून आपल्या आई भीमाबाई जाधव व लहान मुलगा महेश जाधव याला सोबत घेऊन आपल्या भावाकडे बिडकीन येथे जात असताना दुचाकी घसरून खाली पडले यात आई भीमाबाई जखमी झाली तर दोघाना किरकोळ मार लागला आहे

दि १४ सोमवारी प्रतिनिधी वृत्तसंकलन साठी गेले असता त्याच वेळी दुचाकी वरून एक इसम जात असताना दुचाकी खड्डे चुकवताना महिला थोडक्यात खाली पडताना वाचलीत्याच वेळी थोड्या वेळाने पल्सर क्र MH२० FR ७६५४ वरील तरुण तरुणी दुचाकी घसरून खाली पडले यात तरुणीला पायाला व गुढग्यावर मार लागून जखमी झाले होते

रस्त्यावर अपघातात पडलेले वाहन व खड्डे वाचवण्यासाठी अनेक अपघात सुरूच आहेप्रशासनाने या गंभीर बाबीकडे लक्ष केंद्रित करून रस्त्यावर असलेले खड्डे लवकरात लवकर बुजवण्यात यावे अशी मागणी काँग्रेस पश्चिम तालुका अध्यक्ष सर्जेराव चव्हाण ,माजी सरपंच जनार्दन गवळी,उपसरपंच मनेश गाजरे, ग्रामपंचायत सदस्य कडू कीर्तिकर ,कृष्णा मुळे, धमपाल गायकवाड,प्रवीण बर्डे व बबन साठे,बाळू हेकडे,नंदू मुळे, सुधाकर हेकडे,नितीन वानखेडे ,भारत भास्कर, व वाहन चालक यांनी मागणी केली आहे

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी या शाळेतील मुख्याध्यापकाचा मनमानी कारभार, विद्यार्थी पूरक पोषण आहारापासून वंचित




**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : खुलताबाद तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी या शाळेतील मुख्याध्यापकाचा मनमानी कारभार चालू आहेशाळेचे मुख्याध्यापक श्री लहाने हे शाळेत येतात पण शाळेत हजेरी लावतात आणि पुर्ण शाळा न करता दुपार नंतर टपालाच्या नावाखाली दांडी मारून निघून जातात त्यांचे एक दिवसाचे नसून नेहमीचेच आहे असे पालकांनी सांगितले.

एका तक्रारी मध्ये सरपंच राणी चांडे,उपसरपंच पांडूरंग मधे मा.सभापती भिमराव खंडागळे शालेय समितीचे अध्यक्ष वंदना मेंगाळ, उपाध्यक्ष गणेश पवार व पालक या सर्वांच्या समक्ष या तक्रारींचा न्याय निवाडा केला होता परंतू तरीही त्याच्यामध्ये सुधारणा होतांना दिसून येत नाही पालकांनी चार वेळेस तक्रार करूनही समजूत काढूनही ते समजायला तयार नाही असी पाचवी तक्रार पालकांनी केली आहे व सर्व पालक मिळून शाळेचे केंद्रप्रमुख श्री हार्दे सर यांना दि १५ सप्टेंबर २०२५ रोजी बदलीचे अर्ज दिले आहे बदली न केल्यास पुढील पाऊल उचलण्यात येईल असा संतप्त पालकांनी ईशारा दिला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ सप्टेंबर २०२५


# रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने अभियंता दिनी अभियंत्यांचा सत्कार..



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने अभियंता दिनाचे औचित्य साधून शहरातील विविध अभियंत्यांचा सत्कार सोमवारी (ता. १५) रोजी नगर परिषदेच्या सभागृहात करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी होते. यावेळी नगरपरिषदेच्या नगर रचना सहाय्यक सुमित्रा गिरी, रोटरीचे सचिव कलाप्पा पाटील यांची उपस्थिती होती. प्रारंभी भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नगर अभियंता राहुल यादव, पाणीपुरवठा अभियंता पवनकुमार सुतार, प्रशासकीय अधिकारी श्रीराम नाडे, नगर रचना सहाय्यक सुमित्रा गिरी, प्रधानमंत्री आवास योजना अभियंता गौरव वडे, महावितरणचे अभियंता सचिन वाघमारे तर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा राज्यस्तरीय आधारस्तंभ पुरस्कार मिळाल्याबद्दल अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सुमित्रा गिरी, राहुल यादव, सचिन वाघमारे आदींनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी म्हणाले की, रोटरीही समाजातील विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या लोकांचा सत्कार करून त्यांनी करत असलेल्या कामाचे कौतुक करून त्यांना पुढील कार्यासाठी प्रेरणा, बळ देते. ज्यामुळे अशा लोकांच्या हातून भविष्यासाठी समाजोपयोगी कार्य त्यांच्या हातून घडावे.

सुशील कांबळे, पाशा जेवळे, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. भूषण पाताळे, सुनिल राठोड, शिवकुमार स्वामी आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महेश मोटे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार कलाप्पा पाटील यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने नगरपरिषदेचे कर्मचारी वृंद व नागरिक उपस्थित होते.

फोटो ओळ: मुरूम, ता. उमरगा येथे रोटरीच्या वतीने सत्कार करताना आप्पासाहेब सूर्यवंशी, सुमित्रा गिरी, कलाप्पा पाटील, सर्व सत्कारमूर्ती व अन्य.

# आंतरशाळेय निबंध, पोस्टर, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा स्पर्धेचे पुरस्कार वितरण संपन्न



**जालना (प्रतिनिधी)** : येथील श्रीमती दानकुँवर हिंदी कन्या विद्यालय एंव कनिष्ठ महाविद्यालय जालना व एकात्म मानव दर्शन व पंडित दिनदयाल उपाध्याय हिरक महोत्सव समिती तर्फे आयोजित आंतरशाळेत निबंध/ पोस्टर/ वक्तृत्व / प्रश्नमंजुषा स्पर्धेचे पुरस्कार वितरण आज संपन्न झाले .प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले .कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष महेंद्रकुमारजी गुप्ता, संस्थेचे कोषाध्यक्ष व अशासकीय सदस्य पंडित दीनदयाल उपाध्याय हिरक महोत्सव समिती, कार्यकारिणी सदस्य विनोदजी अग्रवाल, मुख्याध्यापिका सौ .गायत्री शुक्ला, पर्यवेक्षक राजेश देशपांडे , विविध स्पर्धेचे परीक्षक श्रीकांत चिंचखेडकर, डॉ . माधव ढेरे, सतीश संचेती, सीमा नादरे यांची व्यापीठावर उपस्थिती होती.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ .अर्चना लोखंडे यांनी केले ,याप्रसंगी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनातील विविध पैलु उडगलणारी एक सुंदर नाटिका विद्यार्थीनी सादर केली .पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनातील घटना व कार्य यावर प्रश्नमंजुषा ही घेण्यात आली .विविध शाळेतून विद्यार्थ्यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनावरील व त्यांच्या विचारावर रेखाटलेले सुंदर असे चित्रांचा प्रदर्शन ही भरविण्यात आला .या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी विविध शाळेतून आलेल्या स्पर्धकांनी निबंध , पोस्टर वक्तृत्व ,प्रश्नमंजुषा स्पर्धेत आपला उत्स्फुर्त असा सहभाग नोंदविला .या विविध स्पर्धेत प्रामुख्याने राष्ट्रीय हिंदी विद्यालय (अंग्रेजी )माध्यम , महाराष्ट्र हायस्कूल , नवयुवक विद्यालय ,स्व . नंदकिशोर सहानी विद्यालय ,श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,श्री म .स्था जैन विद्यालय , शांती निकेतन विद्यालय , स्व लालचंदजी सकलेचा (अंग्रेजी ) माध्यम, विद्यालय ,मराठा विद्यालय ,सि .टी . एम .के . विद्यालय या शाळानी सहभाग नोंदविला .निबंध स्पर्धेत सोहा नजीब शेख - प्रथम, यशिका प्रमोद बागडी - द्वितीय , गार्गी गिरीश जोशी - तृतीय तसेच वक्तृत्व स्पर्धेत सायली सतीश गोरे - प्रथम , श्रावणी शिवाजी बानेलवाड - द्वितीय, वरद नारायण भुजंग - तृतीय पोस्टर स्पर्धेत रसिका नंदू रामटेके -प्रथम, हर्ष संदीप बावणे -द्वितीय, कुमकुम सुरेश जांगीड - तृतीय ,निर्मला सुरेश जग धणे - उत्तेजनार्थ ,श्रावणी रवींद्र हिवरे- उतेजनार्थ स्वाती बाळासाहेब बारटक्के उतेजनार्थ असे यश संपादन केले .

या सर्व विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोख रक्कम , प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले .याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष व अशासकीय सदस्य पंडित दीनदयाल उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव समितीचे श्री संजयजी अग्रवाल यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनातील अनेक घटनांचा उल्लेख करून राष्ट्राच्या हितासाठी त्यांनी दिलेला योगदानाबद्दल सविस्तर माहिती दिली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ .गायत्री शुक्ला, परिक्षक श्रीकांत चिंचखेडकर यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले .संस्थेचे अध्यक्ष श्री महेंद्रकुमारजी अग्रवाल यांनी ही मोलाचे मार्गदर्शन केले .याप्रसंगी संपन्न झालेल्या विविध स्पर्धेच्या परिक्षण करणाऱ्या परीक्षकांचा ही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला.

सौ .चारुशीला दाभाडकर, प्रियंका चित्राल ,सौ .मनीषा दायमा ,सौ .किरण शर्मा ,सौ . शिल्पा पारिक , चंद्रकांत दायमा,सौ .दिपाली मित्तल , यांनी परीक्षणास सहकार्य केले . या सर्वांचाही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले .याप्रसंगी प्राध्यापक /शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी विविध शाळेतून आलेले विद्यार्थी /विद्यार्थीनी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांची उपस्थिती होती .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालय व शाळेच्या शिक्षक / शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन सुरेंद्र धोका व आभार प्रदर्शन सौ . प्रियंका चित्राल यांनी केले .




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ सप्टेंबर २०२५


# दीशा उजळायचा संदेश देणारी प्रकाशमान कविता : 'तरीही मुळं ओल धरून आहेत'



ज्येष्ठ आंबेडकरी कवयित्री सुरेखा भगत यांनी 'साक्ष' या पहिल्या कविता संग्रहामुळे साहित्य प्रांतात दमदार उपस्थिती नोंदवली होती. खूप वर्षानंतर त्यांचा "तरीही मुळं ओल धरून आहेत" हा दमदार कविता संग्रह हस्तगत झाला. त्यात 'लढा जिवंत ठेऊ या!', स्त्री ब्रीद आणि अत्त दीप भवं या तीन विभागात चिंतनगर्भ सकस कविता वाचायला मिळतात.

सलामीच्या पहिल्याच कवितेत त्या गर्जना करतात - "अन्यायाविरुद्ध आपण बुलंद लढू या संपलो तरी चालेल लढा मात्र जिवंत ठेऊया !"व्यवस्थेत गुदमरलेल्या माणसाला त्यांनी चेतवलं आहे. संयतपणे विद्रोहाचा बिगूल वाजवत सरसावलेली ही कविता पुरुषी वर्चस्ववादी, तुच्छतावादी मानसिकतेला अनावृत्त करून सोडते. वांझ अर्चना, प्रार्थना जर समता प्रस्थापित करत नसतील तर या काय कामाच्या? असा खडा सवाल ही कवयित्री करते. दु:खी पीडितांच्या वेदनेने मन अस्वस्थ झाल्याशिवाय स्थित्यंतर होणार नाही. सुरेखा भगत ह्या मनात मानवतेचा महासागर जोजवणाऱ्या चिंतनशील कवयित्री आहेत. त्या संतप्त न होता समजावून सांगण्याच्या स्वरात अभिव्यक्त होतात. त्या म्हणतात - "केवळ शब्दांनी करुणा पांघरून उब देता येत नसते मित्रामायेचा हातही पाठीवरुन फिरावा लागतो वांझोट्या शब्दांच्या जंगलात विश्वासाची दिशा कशी दिसणार?"

सुरेखाताईंची कविता प्रगल्भ होऊन अवतरली आहे. ती वेगवेगळ्या रुपाकारात तेजस्वी विचार प्रकट करते. 'बंद दरवाजे', 'फक्त एवढंच सांग !', 'व्यवस्था' यासारख्या कविता वाचकांना अंतर्मुख करतात."तू केवळ मूर्तीसमोर हात जोडायला न सांगताहात हातांत घ्यायला सांगतू पायऱ्या मोजायला न सांगतापायरी पायरीवर चढायला सांग""बोली आमची, शिकवणारे तेसंस्कृती आमची, लिहिणारे ते टेहळणी आमची, सुरक्षित तेसंख्या आमची, कारभारी ते"

सन्मार्गाला जाण्यासाठी सामाजिक परिवर्तन व्हावे, असे या कवयित्रीला वाटते. 'माणूस होण्यासाठी' या कवितेत कवयित्रीने आंबेडकरकरी ऊर्जेचा बारूद ठासून भरलाय. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान हेच ऊर्जेचा महास्त्रोत आहे ! "मी तेजोमय होण्यासाठीविज्ञानाला आत्मसात केले !" साठवणाऱ्यांच्या डोळ्यांत वाटण्याचे, दान करण्याचे अंजन घालणारी कवयित्री नाते तोडणाऱ्यांना बंधुता समजावते.कवयित्रीची 'समाज' नावाची कविता अनोख्या प्रश्न आणि उत्तराच्या फॉर्ममध्ये अभिव्यक्त होते."जो प्रामाणिक असतो तोच चिडतो जो स्पष्ट बोलतो तो उद्धट ठरतो या स्वभावाला काय वाईट म्हणू ?(नाही) अशांनाच फक्त आपले म्हणू !" समता फ्रीजमधल्या थंडगार आवर्तात शाबूत ठेवणाऱ्यांवर प्रहार करणारी ही कविता गरिबाच्या मीठभाकरीची महती गाते. तीचं मनं जुळली की, जवळ येतील वाटा हे तत्वज्ञान मेंदूत उतरवते. सुरेखा भगत यांची कविता जीवन जाणिवांवर, त्यातील जाचक समस्यांवर भाष्य करणारी विचार कविता आहे."त्याने पै-पै जोडून बंगला तयार केलामी पळ-पळ वेचून ग्रंथ तयार केला"

अशा मुक्तकातूनही कवयित्रीने मोठा संदेश दिलाय. इतरांना माणूसपणाच्या धम्मात आणण्याची प्रतिज्ञा करणारी ही तेजस्वी कविता आहे ! तेच तिचे बलस्थान आहे !! आरोग्य, शांती, समाधान याला दौलत मानून: सहनशीलता, परोपकार, दान याला ठेव समजण्याची शिदोरी वाटत ही कविता अंधारातून प्रकाशाकडे निघाली आहे. "आधी हातांत हात घालून गडावर चढू धम्माची राजमुद्रा त्या गडावर रोवू !"

असं म्हणत अक्षरमुद्रा कोरत, प्रतिक्रांतीला क्रांतीत बदलायच्या ध्यासाने झपाटलेली ही बलदंड कविता आहे! अगणित प्रश्नांचे दार उत्तराच्या किल्ल्यांनी उघडण्याची तिची जिद्द कायम आहे. समाज संस्कृतीच्या अंधुक डोळ्यांत जागृतीचं जालीम अंजन घालणाऱ्या या कवितेचं जोरदार स्वागत करायला हवं!

या चिंतनधर्मी कवयित्रीने 'स्त्री बीदं' या विभागातील कविता महिला अबला नसून सबला आहेत हे सिद्ध करण्यासाठीच लिहिल्या आहेत. दुहेरी शोषणाच्या चरकात गुदमरणाऱ्या स्त्रीला कुणी सिगारेटसारखं ओढलं, कुणी तंबाखू समजून ओठात दाबलं, कुणी मद्य समजून प्राशून टाकलं ! समस्त स्त्रीवर्गाच्या वतीने संतप्त होत, अस्वस्थ होत अहंकारी पुरुष वर्गाचा हिशोब चुकता करून टाकलाय, संविधानाने तिला समतेच्या सिंहासनावर पुरुषांच्या बरोबरीने आसनस्थ केलं आहे. कवयित्रीने तिला भगिनी, माउली, कामिनी, सौदामिनी, तेजस्विनी, रणरागिणी म्हणत तिचा स्वाभिमान जागवला आहे ! 'अंदाज', "हो, मी बोलती झाली' 'बोन्साय' व यासारख्या सर्वच कविता कवयित्रीच्या चिंतन सामर्थ्याचा परिचय करून देतात.

कवितेवर अफाट प्रेम करणाऱ्या या कवयित्रीने कवितेवर तीन कविता लिहिल्या आहेत. कवयित्री म्हणते —"माझी कविता काटेरी वनातून फिरणारी काट्यांशी जवळीक साधणारी" असं असलं तरी या कवयित्रीला -"कविता — ममतेचा पंख गर्जेनेचा शंख बंडाचा डंख असते...!" (ठिणगी पृ. ०३)याचं या कवयित्रीला भान आहे. आईवर भरभरून कविता लिहिणारी कवयित्री म्हणते — "आई तू माझा शब्दकोश, तू माझी गाथा तुझ्यामुळेच जडणघडण, तुझ्यामुळेच उंच माथा !"असह्य मरणकळा सोसून स्पंदनशील जीव जन्माला घालणाऱ्या आईचं ऋण कधीच फिटत नसतं!

'अत्त दीप भवं' या कवितेत कवयित्री युगनायक बाबासाहेबांना ज्ञानसम्राट, मुक्तिदाता म्हणते. त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता हा एल्गार पूकारून समस्त मानवजातीला अस्मिता बहाल केली! 'कबीरा'ला सन्मानित करणाऱ्या कवयित्रीची निष्ठा वंदनीय आहे. आज स्त्रीने बुद्धीच्या प्रांतात पुरुषांनाही मागे सारलं आहे. आंध्रप्रदेशात एका भार्गवी नावाच्या शिक्षिकेने अद्यावत हेल्मेटचा आविष्कार केलाय. ते घातल्याशिवाय गाडी सुरूच होत नाही. मद्य घेतल्यास गाडी सुरु होत नाही. ही विज्ञानाची किमया !

ज्येष्ठ समीक्षक, विचारवंत डॉ. महेन्द्र भवरे यांची प्रस्तावना न्याय देणारी आहे. समीक्षक, विचारवंत डॉ. युवराज सोनटक्के यांची ऊर्जावान पाठराखण जोरदार आहे. त्यांनी या संग्रहाचा "फिरभी जड़े गीलापन लेकर है" या नावाने केलेला हिन्दी अनुवाद चिंतनीय आहे. वाचनीय, संग्राह्य कृती दिल्याबद्दल संवेदना प्रकाशनाला धन्यवाद द्यायला हवे. "दिशा उजळू लागल्या आहेत नवा विचार, नवा प्रकाश सम्यक विचार पसरवीत आहे" सकस विचार घेऊन दिशा उजळून टाकायचा वज्रनिर्धार करणाऱ्या या कवयित्रीस प्रकाशमय सदिच्छा!


**डी. बी. जगत्पुरिया,**

मो. 9860485398


# सहवास

सहवासातील आठवणी या प्रत्येकाच्या निरनिराळ्या असतात.स्वाभावानुरुप असतात.आता सहवास हा कुणाला कितपत कोणाचा सहवास आवडतो हा ज्याचा, त्याचा प्रश्न असतो. सहवास म्हटलं की स्त्री पुरुष संबंध यांच्यातील सहवास डोळ्यासमोर येतो.विवाहा या पवित्र बंधना नंतर पती-पत्नी एकत्र येतात. प्रियकर प्रियसी यांच्यातील आपसातला सहवास. प्रियकर हा प्रेयसीच्या मागे मागे जाणारा व तिला आपल्या बोलण्याने भुलवणारा , तिच्या प्रत्येक हट्टाला पुरवणारा दिसतो.

पती-पत्नीमध्ये बायको पतीच्या मागेच धावणारी,त्याला काय हव नको बघणारी.पतीला ही बायको म्हणजे आपली गुलामच वाटते. त्याला जेव्हा तिचा सहवास हवा असेल, उपभोग घ्यायचा असेल, तो तिच्या मनाची परवा न करता, सहजरीत्या आपला हक्क म्हणून आपल्या अधिकाराची वस्तू म्हणून एक भोगवस्तू म्हणून तो तिच्याकडं बघत असतो. आताच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करता सहवास ही गोष्ट अनैतिकतेच्या पातळीवर घसरत चाललेली आहे.पुरुषांना एखाद्या आवडत्या स्त्रीचा सहवास मिळाला नाही तर तो ओरबाडून घेतो.ती व्यक्ती आपल्याला मिळण्यासाठी कुठल्याही थराला तो जाऊ शकतो.

सीता रावणाच्या तावडीत होती पण रावणाने तिला कधीच स्पर्श सुद्धा केला नाही. रावण सारखं तिला समजावत होता की, 'त्या रामात काय आहे?' "माझ्यासोबत लग्न कर....! माझी राणी हो...!""मी तुला फुलासारखं ठेवीन....!"परंतु तिच्या मर्जी विरुद्ध त्याने तिला स्पर्श केला नाही... पण आज कलकत्त्याची डॉ मुलगी असेल किंवा दिल्लीची निर्भया असेल बदलापूरच्या सुकुमार कोमल छोट्या छोट्या मुली असतील...!आज माणसातली पाशवी वृत्ती जागी झालेली आहे ती पदोपदी आपल्या दिसते.त्याचा दर्शन घडते.

समाजामध्ये या सर्व समाजाला नैतिकतेचा मार्ग दाखवणे नैतिकतेच्या पातळीवर नेणं फार गरजेचे झालेला आहे; कारण सगळीकडे पाश्चात देशांमध्ये ज्याप्रमाणे भोगवादी वृत्ती आहे.त्या पद्धतीनेच भारतीयांच्या मनामध्ये फक्त भोगवादी वृत्तीचा जन्म होत आहे.आपली भारतीय संस्कृतीचा र्हास होत आहे. आपण कोणत्या गोष्टी अंगीकाराव्यात व कोणत्या गोष्टी सोडून द्याव्यात हा ज्याचा त्याचा प्रश्न असला ;तरी माणसाला विचार करण्याची क्षमता आहे.ती लोप पावत आहे.या डिजिटल युगामध्ये मुलांना सर्रास मोबाईल इंटरनेट या सर्व सुविधा हातात उपलब्ध असल्यामुळे ज्या नको त्या वेबसाईट बघतात; व त्यांच्या मनावर त्याचाच परिणाम राहतो.त्यांचे विचार तसेच होतात. मानवाच्या मनात जे विचार असतात त्या विचारांचा प्रभाव त्याच्या कृतीतून दिसून येतो.माणसाचे विचार चांगले असणे सकारात्मक असणे.हे फार महत्त्वाचे असते.

त्या विचारांवरच माणूस घडत असतो.आपल्या आजूबाजूचा परिसर किंवा आजूबाजूचे लोक घडवत असतो. ज्या विचारांच्या माणूस सहवासात येतो, त्या विचारांचाच प्रभाव त्याच्यावर असतो. आजकाल बहुसंख्यात्मक लोकांची वृत्ती ही भोगवादी झालेली आहे.युज अॅण्ड थ्रो च्या या जमान्यात माणसांची नैतिक पातळी घसरत चालली आहे.स्त्री-पुरुषांना सुद्धा या घटकेमध्ये बसवलं आहे.युज अॅण्ड थ्रो...! काम संपलं की तू कोण ? परंतु ,असे न करता मला असं वाटतं की, आपली भारतीय संस्कृती ही जपली पाहिजे नैतिकता ढळू न देता तिचं पालन केलं पाहिजे आणि याच आधारावर आपली भारतीय संस्कृती आहे. कुटुंब संस्था आहे.लग्न हा एक संस्कार आहे.पण;आज - काल कोणालाही कुणाची गरज उरली नाही. सगळ्या गरजा आपोआप भागवल्या जात आहे. माणसातली भोगवादी वृत्ती मोठ्या प्रमाणात बळावली आहे.

स्त्री ही फक्त भोगाची वस्तू नाही, पुरुषाशिवाय स्त्रीचे आणि स्त्री शिवाय पुरुषाचे जीवन सर्व पातळ्यांवर अपुरे असते.मनुष्य हा बुद्धीवादी किंवा समाजाशी असला तरी मुलत: तो प्राणी आहे.निसर्गाची म्हणून एक सनातन प्रेरणा असणारच..ती म्हणजे पुढे सरकणे...!निसर्गाने जे जे निर्माण केले ते ते सतत पुढे सरकत राहिले पाहिजे.असे हे सूत्र आहे...या सतत पुढे सरकण्याची प्रक्रिया म्हणजेच मालिका निर्माण करण्याची प्रक्रिया संतती निर्माण करण्याची प्रक्रिया होय.निसर्गाच्या प्रेरणेनेच स्त्री-पुरुष संबंध निर्माण होतात.म्हणूनच ते नैसर्गिक असतात.आणि म्हणूनच ते अपरिहार्य आकर्षक सुंदर असतात.

स्त्री-पुरुषांची सुंदरता कळावी लागते.स्त्री पुरुष संबंधांचा परस्परांनी सौंदर्यात्मक आस्वाद कसा घ्यायचा हे सहज करू शकते.शारीरिक भुकेच्या पलीकडे कसे जगायचे...कसे जायचे; आणि सौंदर्यात्मक आस्वाद कसा घ्यायचा येथे सूक्ष्मज्ञान झाले; की आस्वादत्त मने कसे सहस्त्र पाकळ्यांनी फुलून येते...भोगाची पाचवी पातळी आपोआप गळून पडते.भोग आणि आस्वाद यात नेमका कोणता फरक आहे? याचे विस्तृत विवेचन आनंद यादवांच्या "स्पर्श कमळे" मध्ये दिसते.गुलाबाच्या पाकळ्या काढून कुस्करून गुलकंद करून खाणे म्हणजे भोग...!त्याच इच्छेने गुलाब फुलाकडे पाहणे म्हणजे भोगलालसा आणि गुलाबाला ते नाजूक फुल आहे.

या जाणिवेने खुडून घेणे.त्याचा गंधपार आतड्यांपर्यंत खोल हुंगणे....!त्याच्या अतिकोमल पाकळ्यांना हळुवार स्पर्शून स्पर्श सुख घेणे.त्याचा गार स्पर्श डोळ्यांना देणे, पाकळ्यांचा रंग छटाछटा निशी निहाळणे.त्यांचे गोलाकार डौलदार रूप डोळ्यांनी अनुभवणे.बोटांच्या संवेदनाशील डोळस नाजूक टोकांनी कोमल पाकळ्या अधिक फुलविणे त्यांना नखांची जखम जराही होणार नाही.अशा बेताने हळुवार स्पर्शने म्हणजे आस्वाद घेणे होय.हा फरक आहे भोग आणि आस्वाद या मधला ,रूप म्हणजे आकार नव्हे निसर्ग किंवा परमेश्वर काहींना रूप देतो तर काहींना फक्त आकार देऊन मोकळा होतो.झाडाला फांदीला त्याने आकार दिलेला असतो; पण फुलांना फुलपाखरांना त्यांनी रूप दिलेले असते.शेतकरी मेथीची किंवा फुलांची ही जुडी बांधतो.आणि जाणकार त्याच फुलांच्याच पेटीला सोडून पुष्पगुच्छ तयार करतो..पें

ढी आणि गुच्छ यातील फरक म्हणजे आकार आणि रूप यातील फरक असते.काकूबाईंना आकार असतो तर युवतींना रूप असते.हा फरक ज्यांना कळत नाही ते दुर्दैवी, भूकवादी पशु असतात.ज्यांना हा फरक कळतो ते सुदैवी आस्वादवादी रसिक असतात.वाङ्मयातून व्यक्त झालेला आहे.सहवास हा एकमेकांना हवाहवासा वाटावा...तोच सह म्हणजे सोबत वास म्हणजे रहाणं...यालाच म्हणतात सहवास.....!


**डॉ योगिता मंगेश कथले (देवगिरीकर)**

मो. 8975291940